बीड । महाराष्ट्र
शनिवार दि. ७ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३४
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## अर्थसंकल्पातील सर्वात मोठी घोषणा

# शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर!

मुंबई । वृत्तसेवा

**महायुती सरकार सत्तेत आल्यापासून कर्जमाफीच्या निर्णयाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्याचे नवनिर्वाचित अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मांडताना कर्जमाफीच्या निर्णयाची घोषणा केली. आम्ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना राबवण्याचं आश्वासन दिलं होतं. त्यासाठी समिती गठीत केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मी आज जाहीर करत आहे, अशी घोषणा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन पर लाभ दिला जाणार असल्याचेही फडणवीस यांनी जाहीर केले.**



कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबत राज्यातील बँकिंग यंत्रणा सक्षम असावी, यासाठी समितीच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात येईल. शेतकरी वारंवार कर्जबाजारी न होता त्याला कायमचा कर्जमुक्त करण्याचा सरकारचा संकल्प असून समितीच्या शिफारसीनुसार दीर्घकालीन उपाययोजन केल्या जात आहेत, असेही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून विरोधकांकडून महायुती सरकारला शेतकरी कर्जमाफीच्या योजनेचे काय झाले, असा जाब विचारत होते. निवडणूक झाल्यानंतर सरकार शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन विसरले, अशी टीका विरोधकांकडून केली जात होती. मात्र, आज देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा करुन विरोधकांच्या या टीकेतील हवा काढून घेतली आहे. मात्र, ही कर्जमाफी नेमकी कोणाला मिळणार, याचे निकष आणि तपशील अद्याप समोर येणे बाकी आहे. ▶▶ पान २ वर

## दूरदृष्टी दर्शविणारा अर्थसंकल्प—धनंजय मुंडे

स्व.अजितदादांच्या विकासाच्या व्हिजनला आजचा अर्थसंकल्प समर्पित करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी २०४७ सालच्या विकसित महाराष्ट्राच्या पायाभरणीचा नवीन अध्याय आज सभागृहात मांडला असून महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीने आजचा अर्थसंकल्प प्रगतिशील, शाश्वत, सुशासन आणि सर्वसमावेशक अशा चार स्तंभांच्या माध्यमातून राज्याच्या चौफेर विकासाची चतुसूत्री मांडणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे. २५ सप्टेंबर, २०२५ पर्यंत कर्ज घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांचे २ लाख पर्यंतचे कर्ज माफ करणे तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा ही महायुती सरकारवर जनतेने टाकलेल्या विश्वासबद्दलची कृतज्ञता आहे. या निर्णयाबद्दल सर्व शेतकरी बांधवांचे मनापासून अभिनंदन करतो. ▶▶ पान २ वर

## बीड बसस्थानक परिसरात तरुणाचा संशयास्पद मृत्यू

बीड । प्रतिनिधी

शहरातील अत्यंत गजबजलेल्या बसस्थानकाच्या पाठीमागील बाजूस शुक्रवारी सकाळी एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. गांधी नगर परिसरातील नौशाद असे या मृत तरुणाचे नाव असून, त्याचा खून झाल्याची प्राथमिक चर्चा परिसरात वर्तवली जात आहे. ही घटना शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप अधिकृतरित्या स्पष्ट झाले नसले तरी, पोलीस सर्व बाजूंनी या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. भरवस्तीत अशा प्रकारे मृतदेह सापडल्याने ▶▶ पान २ वर

## स्व.अजितदादांना अभिप्रेत असणाऱ्या विकसित बीडसाठी अर्थसंकल्पीय तरतुद-आ.पंडित

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत अजितदादा पवार साहेब यांना यंदाचा अर्थसंकल्प समर्पित करून स्व. दादांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे स्मारक उभारून त्यांच्या नावे गतीमान नागरी सेवा पुरस्कार जाहिर करून स्व. अजितदादांना अभिप्रेत असणाऱ्या विकसित बीडसाठी विशेषतः बीड जिल्ह्यातील दोन महत्वाच्या आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणाची घोषणा अर्थसंकल्पात केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. गेवराई विधानसभा मतदार संघातील सिंदफणा नदीवरील



टाकळगाव बॅरेज बांधकामासाठी पाच कोटी रुपये , न्यायालय इमारत बांधकामासाठी पाच कोटी रुपये तर विविध रस्त्यांच्या कामांसाठी २५ कोटी रुपयांची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. कर्जमाफीसह शेतकरी हिताच्या अनेक बाबींचा समावेश या अर्थसंकल्पात असल्यामुळे हा अर्थसंकल्प शेतकरी आणि शेतमजुरांना दिलासा देणारा असल्याची प्रतिक्रिया आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. बीड जिल्हा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी ३६० खाटांचे रुग्णालय बांधकाम, नर्सिंग कॉलेज आणि वसतीगृह बांधकामासह स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेच्या इमारतीच्या एकत्रिकरणाचा ▶▶ पान २ वर

## अंबाजोगाईत १९०० खाटांच्या अत्याधुनिक रुग्णालयासाठी



# १०२ कोटींचा निधी मंजूर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने ११०० खाटांचे नवीन अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून या प्रकल्पासाठी १०२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी केलेल्या सातत्यपूर्ण आणि अभ्यासू पाठपुराव्याला यश आले असून वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानपरिषदेत ही घोषणा केली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा विस्तार होणार असून स्थानिक नागरिकांना ▶▶ पान २ वर

## राष्ट्रीय जलजीवन मिशनमधील कथित बोगस कामांबाबत

# माजलगावात 'अर्धनग्न हलगी बजावो' आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा प्रभारी अ‍ॅड. अमोल डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती कार्यालयासमोर 'अर्धनग्न हलगी बजावो' ▶▶ पान २ वर



# अर्चना कुटे यांना ईडी कोठडी

## ज्ञानराधा मल्टिस्टेट घोटाळा

मुंबई । प्रतिनिधी

बीड येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमधील करोडो रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत अर्चना सुरेश कुटे यांना अटक केली आहे. मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयाने त्यांना ७ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली असून, गुंतवणूकदारांची फसवणूक आणि मनी लाँड्रिंगच्या गंभीर आरोपाखाली ही कारवाई करण्यात आली आहे. ईडीच्या मुंबई विभागीय कार्यालयाने २ मार्च रोजी प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँड्रिंग क्ट (पीएमएलए) २००२ अंतर्गत ही अटक केली असून, त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. जुलै २०२४ मध्ये महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांत दाखल झालेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. सुरेश कुटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्ञानराधा मल्टिस्टेटच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी वार्षिक ▶▶ पान २ वर



# पोद्दार शाळा पुन्हा आरटीई प्रवेशासाठी खुली

## गोरगरीब विद्यार्थ्यांना दिलासा ; मनोज जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आलेल्या आणि नंतर तो निर्णय रद्द झालेल्या राज्यातील ७५ शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनःसमावेश करण्याची मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत शिक्षण विभागाने संबंधित शाळांचा आरटीई पोर्टलवर पुनःसमावेश करण्याचा निर्णय घेतला असून यामध्ये बीड येथील पोद्दार शाळेचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आता ही शाळा आरटीई प्रवेशासाठी पुन्हा उपलब्ध झाली आहे. मनोज जाधव यांनी या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, शिक्षण मंत्री तसेच प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन सादर करून विद्यार्थ्यांच्या हिताचा मुद्दा मांडला होता. या मागणीची दखल घेत शिक्षण संचालकांनी दि. ४ मार्च रोजी राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना संबंधित शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनःसमावेश करण्याबाबत आदेश जारी केले. दरम्यान, अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या प्रक्रियेत ▶▶ पान २ वर



# संपादकीय

## विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६–२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी–स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे. शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय–टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी यंदा ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला असून, अर्थसंकल्पातील एकूण तरतुदींपैकी सुमारे ६० टक्के वाटा (४८ हजार १६४.२८ कोटी रुपये) भांडवली खर्चासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ५ हजार ५२० कोटी रुपयांची तरतूद आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेत प्रशासक म्हणून कारभार सुरू असताना मुदत ठेवी ९२ हजार कोटी रुपयांवरून ८१ हजार कोटींवर घसरल्या आहेत, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला गेला. त्यात तथ्य नाही हे अर्थसंकल्पातून दाखवून देण्यात आले. गेल्या तीन–चार वर्षांत रस्ते कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सुशोभीकरणावरही कोट्यवधींचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील खड्ड्यांचे प्रमाण कमी झाले याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे. मात्र, मुंबई शहरात बेस्ट, मेट्रो, एमएमआरडीए या स्वायत्त संस्थाच्या माध्यमातून रस्त्यावर एकाचवेळी कामे सुरू असल्याने, वाहतुकीच्या कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील वर्षी या सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्च २ लाख ३३ हजार कोटी रुपये एवढा होता. त्यामुळे एका वर्षात ११ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेचा महसुली वाढीसाठी सन २०१७ पासून बंद झालेल्या करमणूक शुल्काची आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच विकासकामाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका ग्रीन बाँड्स काढण्याची कार्यवाही करणार आहे. मुंबई शहरात रेल्वे स्थानके, रुग्णालये, शाळा आणि अरुंद पदपथांजवळच्या परिसरात फेरीवाल्यांचे बस्तान बसलेले जागोजागी दिसते. महापालिकेने फेरीवाल्यांचा त्रास कमी करण्यासाठी आणि अधिकृत विक्रेत्यांची ओळख पटवण्यासाठी अर्थसंकल्पात क्यूआर कोड आधारित प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली, त्याचे स्वागत करायला हवे. मुंबईत सुमारे १ लाख फेरीवाले असले तरी सर्वेक्षणात केवळ १५ हजार फेरीवाले पात्र आढळले आहेत.

# पिंपळनेर परिसरात उष्णतेमुळे होऊ लागली जीवाची लाहीलाही

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात गेल्या दोन दिवसापासून उन्हाचा पारा चांगलाच वाढला असून, दुपारच्या वेळेत नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. सकाळपासूनच कडक ऊन जाणवत असून, दुपारी तापमानात लक्षणीय वाढ होत आहे. परिणामी, रस्त्यांवरची वर्दळ कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस तापमान आणखी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेषतः दुपारी १२ ते ४ या वेळेत उष्माघाताचा धोका अधिक असल्याने नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पिंपळनेरच्या आरोग्य विभागाकडून आरोग्य अधिकारी डॉ. चव्हाण यांच्याकडून नागरिकांना उन्हाळ्यात घ्यावयाच्या खबरदारीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. भरपूर पाणी पिणे, टोपी किंवा रुमालाने डोके झाकावे, शक्यतो दुपारच्या वेळी घराबाहेर जाणे टाळावे, हलके व सूती कपडे परिधान करावे तसेच लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी, असे आरोग्य विभागाने आपल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे. तर, आपल्याला चक्कर येत असेल, पोटात मळमळत असेल, डोके दुखत असेल किंवा अशक्तपण जाणवत असल्यास आपण



त्वरित जवळच्या डॉक्टरकडे जाऊन त्यांचा सल्ला घ्यावा, असे आवाहनही डॉक्टर मंडळींनी नागरिकांना केले आहे. वातावरणात सध्या मोठ्या प्रमाणात उकाडा असल्याने नागरिक घराबाहेर पडणे टाळत असल्याने एरव्ही गजबजलेल्या बाजारपेठांमध्ये दिवसभरात शुकशुकाट दिसून येत आहे. तर, दुसरीकडे कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक उकाड्यापासून आपल्या शरीराला दिलासा देण्यासाठी फळांचा रस विकणाऱ्या गाड्या, रसवंतीगृहात गर्दी करताना दिसत आहेत.दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शाळा, बांधकामस्थळे आणि मैदानी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विशेष काळजी घेण्याची गरज व्यक्त होत आहे. नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

पान १ वरून

## शेतकऱ्यांना कर्जमाफी...

* शेतकऱ्यांसाठी दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर; कोणते शेतकरी पात्र ठरणार? : – दोन लाख रुपयांपर्यंतची थकबाकी असलेले शेतकरी. – ज्यांचं पीककर्ज थकलेलं आहे असे शेतकरीच पात्र असतील. – ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले कर्ज माफ होणार. – नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ. शेतकरी, ग्रामीण महाराष्ट्रासाठी अर्थसंकल्पातील मोठ्या घोषणा. * गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूर यांचा हा सहभाग करणार, पाणंद रस्त्यांना मान्यता दिली आहे, ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे, चारही कृषि विद्यापीठात एआयजी मदत घेतली जात आहे, शेतकर्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे, अॅग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे, १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारीपर्यंत झाले आहे, चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील, आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात, गोपीनाथ मुंडे मंडळात आता शेतमजुरांचा ही समावेश करणार, महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल.

## दुरदृष्टी दर्शविणारा...

कृषी समृध्दी मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी ५४ टीएमसी पाणी नार पार मधून मराठवाड्यात आणणे यांसह विदर्भ, खानदेश व कोकणातील नदी जोड प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी सरकारचे विशेष आभार मानले आहेत. ग्रामीण व शहरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासह, रस्ते, महामार्ग, सागरी मार्ग, मेट्रो असे अनेक प्रकल्प मंजूर करताना एक हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावाला काँक्रिट रस्त्याने जोडण्याचा घेतलेला निर्णय हा आगामी काळात क्रांतिकारक ठरणार आहे. प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा, बीड जिल्ह्यातील रेल्वे मार्गाचा राज्य शासन हिस्सा, तसेच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, बीड जिल्हा रुग्णालय येथील मोठ्या विकासकामांना भरघोस निधी मिळणार आहे. राज्य लोकसेवा आयोग व अन्य शासकीय विभागात ७५ हजार पदनिर्मिती तसेच दीड लाख उद्योजक व ५० हजार स्टार्ट अप्स यांसह रोजगार निर्मितीचे ठरवण्यात आलेले लक्ष्य हे अर्थसंकल्पाची दूरदृष्टी आणि सामर्थ्य सिद्ध करणारे आहे. कौशल्य विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र जागतिक पातळीवर स्पर्धा करत असून इथली तरुणाई महाराष्ट्राची ओळख जगाच्या पाठीवर सर्वात प्रगत राज्य म्हणून करण्यासाठी पूरक व्यवस्था या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे,

## स्व.अजितदादांना...

आराखडा मंजुर करून खऱ्या अर्थाने स्व. अजितदादा पवार साहेब यांना अभिप्रेत असलेल्या बीड जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन प्रत्यक्षात साकारण्याचे काम झाले आहे. स्व. अजितदादा पवार साहेब बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर त्यांनी घेतलेल्या बैठकांमध्ये या दोन्ही आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणाचा विषय वारंवार आला होता. स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयात स्व. अजितदादांनी प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील कामाच्या अनुषंगाने आढावा घेतला होता, त्यांनी ही दोन्ही कामे प्रस्तावित केली होती. त्यामुळे खऱ्या अर्थाने स्व. अजितदादांनी विकसित बीडचे पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकारताना दिसत असल्याचे आ. विजयसिंह पंडित म्हणाले. गेवराई विधानसभा मतदार संघातील सिंदफणा नदीवरील टाकळगाव बॅरेज बांधकामासाठी पाच कोटी रुपये , न्यायालय इमारत बांधकामासाठी पाच कोटी रुपये तर विविध रस्त्यांच्या कामांसाठी २५ कोटी रुपयांची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे यांसह गेवराई विधानसभा मतदार संघातील कामांना भरीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. पंडित यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे आभार मानले आहे. महाराष्ट्राचा अकरा वेळा अर्थसंकल्प सादर करून राज्याला आर्थिक शिस्त घालून देणाऱ्या दिवंगत अजितदादा पवार यांना मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी यंदाचा अर्थसंकल्प समर्पित केला आहे. प्रगतीशिल, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार स्तंभावर आधारीत अर्थसंकल्प सादर करून २०४७ पर्यंतची राज्याची अर्थव्यवस्था भक्कम करण्याचा निर्धार आणि आत्मविश्वास आजच्या अर्थसंकल्पातून दिसत आहे. अर्थसंकल्पावर स्व. अजितदादा पवार यांची छाप दिसत असून त्यांचे विकासाचे व्हिजन या माध्यमातून साकारले असल्याची प्रतिक्रिया गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या माध्यमातून दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाची माफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना पन्नास हजार रुपयांपर्यंतचे अनुदान, स्व.गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी भरीव तरतुद, वैतरणा व उल्हास खोऱ्यातील ५४ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी डीपीआर ला मंजुरी, एक हजार पेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावांना काँक्रीट रस्त्यांनी जोडण्यासाठी ४५०० कोटी रुपयांचा कार्यक्रम, पाच हजार पेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व वस्त्या आणि गावांना जोडण्यासाठी पर्यटन परिरथ, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा ३ मध्ये २३ हजार किमीची कामे यांसह महाराष्ट्र राज्याच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या अनेक बाबींचा समावेश या अर्थसंकल्पात दिसतो. शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, शेतमजुर आणि सर्व सामान्य नागरीकांना केंद्रस्थानी ठेऊन भविष्यातील महाराष्ट्र बळकट करणारा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले आहे.

## १०२ कोटींचा...

हक्काच्या ठिकाणी दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळणार आहेत. या रुग्णालयात अत्याधुनिक उपकरणे, तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती आणि विशेषतः हृदयविकार व कॅन्सरवरील उपचारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. सध्या येथे एंजिओग्राफी सुविधा सुरू झाली असून लवकरच पूर्णवेळ कार्डिओलॉजिस्टची सेवाही उपलब्ध होईल. या मोठ्या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसह सर्व संबंधित मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

## पोद्दार शाळा पुन्हा...

गंभीर गैरव्यवहार झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने संबंधित निर्णयाला स्थगिती दिली होती. त्यानंतर अल्पसंख्यांक प्रमाणपत्र देण्यात आलेल्या ७५ शाळांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात

पान १ वरून

आली होती. यामध्ये बीड जिल्ह्यातील पोद्दार शाळेचाही समावेश होता.यामुळे या शाळेत आरटीईमार्फत आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनेक पालकांना अर्ज प्रक्रियेत अडचणी येत होत्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रक्रियेत नुकसान होत असल्याची बाब मनोज जाधव यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती आणि या शाळेचा आरटीई पोर्टल वर समावेश करण्याची मागणी केली होती. ज्या तत्परतेने शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देऊन त्यांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आली, त्याचप्रमाणे निर्णय रद्द झाल्यानंतर त्या शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ समावेश करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली होती. शासनाने या मागणीची दखल घेत सकारात्मक निर्णय घेतला असून संबंधित विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता राज्यातील संबंधित शाळांचा आरटीई पोर्टलवर पुन्हा समावेश झाला असून बीड येथील पोद्दार शाळा देखील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी उपलब्ध झाली आहे, अशी माहिती मनोज जाधव यांनी दिली. त्याच बरोबर राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, शिक्षण मंत्री तसेच प्राथमिक शिक्षण संचालक यांचे त्यांनी या निर्णया संदर्भात आभार मानले आहेत.

## बीड बसस्थानक...

स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासन या घटनेमागील सत्य शोधण्यासाठी आता प्रत्यक्षदर्शी आणि तांत्रिक पुराव्यांची मदत घेत आहे.

## अर्चना कुटे...

१२ ते १४ टक्के परताव्याचे आमिष दाखवले होते. या आकर्षक योजनांना भुलून हजारो लोकांनी आपल्या आयुष्यभराची पुंजी या सोसायटीत गुंतवली. मात्र, मुदत संपल्यानंतरही गुंतवणूकदारांना त्यांच्या ठेवी परत मिळाल्या नाहीत, ज्यामुळे सामान्य जनतेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. ईडीच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून, सोसायटीतील सुमारे २४६७ कोटी रुपये कर्जाच्या नावाखाली कुटे ग्रुपच्या विविध कंपन्यांकडे वळवण्यात आले होते. विशेष म्हणजे, ही अवाढव्य रक्कम कोणत्याही अधिकृत कागदपत्रांशिवाय आणि कोणत्याही प्रकारची सुरक्षा (सेक्युरिटी) न ठेवता हस्तांतरित करण्यात आली होती. या कंपन्यांचे संपूर्ण नियंत्रण सुरेश कुटे आणि अर्चना कुटे यांच्याकडेच असल्याचे निष्पन्न झाले आहे. या निधीचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी आणि इतर व्यवसायांमध्ये गुंतवणुकीसाठी केल्याचा संशय तपास यंत्रणेने व्यक्त केला आहे. या प्रकरणात अर्चना यांचे पती सुरेश कुटे यांना यापूर्वीच अटक करण्यात आली असून, आता अर्चना कुटे यांच्या अटकेमुळे या घोटाळ्याचे धागेदोरे अधिक स्पष्ट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## माजलगावात अर्धनग्न...

आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माजलगाव तालुक्यातील सुमारे १५ ते ३० गावांमध्ये राष्ट्रीय जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना राबवण्यात येत आहेत. मात्र या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप सामाजिक बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा प्रभारी अड.अमोल डोंगरे यांनी केला आहे. अनेक गावांमध्ये प्रत्यक्षात कामे न करता कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. या कथित गैरव्यवहाराच्या निषेधार्थ डोंगरे यांनी माजलगाव येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजना उपविभाग कार्यालयासमोर अर्धनग्न अवस्थेत हलगी वाजवत आंदोलन केले. बोगस कामांची चौकशी करा, संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करा अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. काही काळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारण्यात आले असून प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. दरम्यान, राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या कामांबाबत नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त केली जात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी तालुक्यातील विविध गावांमधून होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.यावेळी आंदोलनात रमेश साळवे,हेमंत गोरे,संदिपान जाधव,ग्यानबा मस्के,सिरसट उपस्थित होते.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# कर्ज फेडण्यासाठी राज्यात १९ शेतकऱ्यांनी कीडन्या विकल्या तरी सरसकट कर्ज माफी नाही

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले असताना शासनाकडून पुन्हा एकदा कर्जमाफी आणि अनुदानाच्या घोषणा करण्यात येत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा आणि नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड करण्यासाठी राज्यात तब्बल १९ शेतकऱ्यांनी किडन्या विकल्या आहेत, तरी पण आपण सरसकट कर्जमाफी देत नाहीत हे शेतकऱ्याचे दुर्दैव आहे , किती समीती गठीत करणार, शेतकऱ्याच वजोवटोळ करण्याचा सरकल्याने विडाच उचला आसतर आम्ही रस्त्यावर उतरु असा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे..



आधी ही सरकारने अशा प्रकारच्या घोषणा झाल्या होत्या आणि प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालाच नाही, ही वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे. पूर्वी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात हजारो शेतकरी त्या योजनेपासून वंचित राहिले. त्यामुळे सध्याची घोषणा देखील शेतकऱ्यांच्या नजरेत विश्वासार्ह वाटत नाही. याबद्दल शंका निर्माण होत आहे.

खरं पाहिलं तर शासनाचे धोरण शेतकऱ्यांना कर्ज घेण्यास प्रवृत्त करणारे झाले आहे. कर्ज काढा आणि नंतर कर्जमाफीसाठी भिक मागा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रोज शेतकरी मृत्यूला कवठाळत आहे , शेतकरी कर्जबाजारी होऊच नयेत यासाठी ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याऐवजी केवळ कर्जमाफीच्या घोषणा करून तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही स्थिती म्हणजे रिंन काढून दिवाळी साजरी करणे या म्हणी प्रमाणे आहे. आज जगातील अनेक देश शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ व्यवस्थापन आणि उत्पादन खर्च कमी करण्यावर भर देत आहेत. मात्र भारतात अजूनही शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे उत्तर कर्जमाफी आणि अनुदान यामध्येच शोधले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची खरी प्रगती होत नाही, उलट त्यांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत जातात. खरंतर शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने खालील बाबींवर भर देणे अत्यंत आवश्यक आहे शेतीमालाला योग्य आणि हमीभाव निश्चित करणे, उत्तम आणि परवडणारी खते व बियाणे उपलब्ध करून देणे शेतकऱ्यांच्या मालासाठी मजबूत बाजारपेठ निर्माण करणे , शेती उत्पादन साठवणूक व प्रक्रिया उद्योग वाढवणे थेट ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहोचवण्याची व्यवस्था उभी करणे शेतकऱ्यांना वारंवार कर्जमाफी देण्यापेक्षा त्यांना स्वाभिमानाने शेती करता येईल अशी व्यवस्था उभी करणे हे शासनाचे खरे कर्तव्य आहे. अन्यथा कर्जमाफीच्या घोषणा या केवळ राजकीय दिखावा करू नका, सरसकट कर्ज माफी द्या, अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जन आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे..

# दिंद्रुडच्या चंद्रभागा पोदार लर्न स्कूला केंद्र सरकारच्या सीबीएसई बोर्डाची मान्यता

● दिंद्रुड नगरीत शैक्षणिक क्रांतीचे एक पाऊल




**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील क्रांती सेवाभावी संस्था दिंद्रुड द्वारा संचालित चंद्रभागा पोदार लर्न स्कूलला केंद्र सरकारच्या सीबीएससी बोर्डाची नुकतीच मान्यता प्राप्त झाली आहे, शाळेच्या व दिंद्रुड नगरीच्या शिरपेचात हा मानाचा तुरा रोवला गेला असुन यामुळे ग्रामीण भागातील दिंद्रुड व पंचक्रोशीत आता मान्यता प्राप्त शाळा मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या जीवनात शैक्षणिक क्रांती येणार आहे.

संस्थेचे अध्यक्ष अतुल ठोंबरे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राहुलजी ठोंबरे यांनी अथक प्रयत्नातुन व शाळेचे प्राचार्य नीलेश निंदाने यांनी शैक्षणिक कार्याला खरे उतरत विद्यार्थी आणि पालक यांनी दाखविलेला विश्वास याच्या जोरावर अल्पावधीतच शाळेला हा मोठा बहुमान सिबीएससी मान्यतेच्या माध्यमातून मिळवला आहे.वर्ष २०२३ मध्ये सुरुवात झालेली दिंद्रुड पंचक्रोशीतील सर्व पालकांच्या विश्वासास व पसंतीस पात्र ठरलेली चंद्रभागा पोदार लर्न स्कूल आज मितीस जवळपासच्या सर्व गावांतील विद्यार्थ्यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे विश्वासार्ह ज्ञानार्जन केंद्र बनले आहे. जवळपासच्या सर्व गावातील शेकडो विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या शाळेची उभारलेली भव्य इमारत, विज्ञान प्रयोगशाळा, गणित लॅब, प्रशस्त ग्रंथालय, खेळासाठी असलेले सर्व प्रकारचे मैदाने,खेळ साहित्य असलेली स्पोर्ट रूम, अनुभवी व तज्ञ शिक्षकवृंद,शाळेला असलेल्या सुस्थितीतील स्कूल बस, निसर्गरम्य परिसर,सोबतच शाळेमुळे परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. जवळपास ५०० हून अधिक विद्यार्थी या शाळेमध्ये ज्ञानार्जन करतात.शाळेला सीबीएससी दिल्ली यांच्याकडून फिलेशन (मान्यता) नुकतीच १९ फेब्रुवारी २०२६ शिवजयंतीच्या मुहूर्तावर प्राप्त झाली या यशाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल ठोंबरेंसह शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारींसह अमूल्य योगदान देणारे विद्यार्थी आणि पालक यांना जात असुन यामुळे शैक्षणिक क्रांती होणार असल्याने समाधान होत असल्याचे मत अध्यक्ष अतुल ठोंबरे यांनी व्यक्त केले आहे.

# सिंदफणा एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे अण्णा यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील आहेर चिंचोली येथील सिंदफणा एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त हजारो मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाला मा. श्री राजेंद्र जगताप ( माजी आमदार), मा. नगरसेवक दिलीप अण्णा गोरे, ह. भ. प योगीराज महाराज रामगड, हभप येवले महाराज हनुमानगड, राष्ट्रवादीचे नेते वैजिनाथ तांदळे, शिवसेना नेते सतीश शेळके, अशोकराव हिंगे, शिक्षण महामंडळाचे दिपकराव घुमरे,माजी सभापती बळीराम आप्पा गवते, जि. प सदस्य प्रकाश दादा कवठेकर, माजी शिक्षणाधिकारी देवगुडे साहेब, उपशिक्षणाधिकारी काकडे साहेब, डव्होकेट शशिकांत सावंत,



शिक्षक नेते उत्तमराव पवार, समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री सुभाषराव पवळ, प्रा. मुकुंदराव काळे, ड. महादेवराव तुपे ( नारायणगडचे विश्वस्थ ), शिक्षक नेते हरिदासजी घोगरे, ग्रामसेवक संघटनेचे नन्नवरे नाना, बीड ट्रॅफिकचे पोलीस उपनिरीक्षक जाधवर साहेब, मराठा सेवक ऋषिकेश दादा बेदरे, माजी नगराध्यक्ष शिवाजीराव जाधव, माजी नगरसेवक भास्करराव जाधव, महिला नेत्या हेमाताई पिंपळे, कमलताई निंबाळकर, जिल्हा परिषद सदस्य जयश्रीताई मस्के, पाडळसिंगी चे प्राचार्य थिटे सर, माळापुरी शाळेचे प्राचार्य डोंगरे सर, यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ सर, गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर प्रल्हादराव झिरपे, श्री सुमंत काळे, आहेर चिंचोली चे सरपंच विकास रकटे, तांदळवाडीचे सरपंच कैलास निर्मळ,फौजी कांतराव सुरवसे, श्री रावसाहेब रकटे, ड. योगेश सुरवसे, श्री बंडू सुरवसे, श्री केदारनाथ सुरवसे,श्री लक्ष्मण काशीद, श्री गांगले सर, श्री रवी बहिर सर, अजय कारंडे, शिवाजी नाना कदम, माजी अधीक्षक श्री तुकाराम घरत सर, सौ.सोनल पाटील मॅडम, श्री विनायक ढास सर, श्री लाटे सर,श्री पांढरे साहेब, इत्यादी सह शेकडो मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन डॉक्टर बाळासाहेब पिंगळे यांनी केले. तसेच काळे अण्णा व त्यांची कन्या राजश्रीताई काळे पिंगळे मॅडम यांचाही वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना राजेंद्र जगताप साहेबांनी सांगितले की श्री महादेवराव काळे यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांनी शिक्षण संस्था उभी करून हजारो गोरगरीब लेकरांना उच्चशिक्षित केले.

## जानकी महोत्सव – २०२६ व मिनी सरस विक्री प्रदर्शनाचे आयोजन

### नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण स्वयं सहाय्यता समूहांमार्फत तयार करण्यात आलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीस प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय जानकी महोत्सव – २०२६ व मिनी सरस विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन दि. ७ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत डॉ. फ्रेजर बॉईज हायस्कूल, आझाद मैदान समोर, जालना येथे भरविण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी परिवारासह भेट देवून ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांची उत्पादीत उत्पादने व खाद्य संस्कृतीला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या गुणवत्तापूर्ण व घरगुती उत्पादनांचे एकूण ८० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, नागरिकांना ग्रामीण भागातील दर्जेदार उत्पादने खरेदी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्टॉल्समध्ये गावठी पद्धतीने तयार केलेले मसाले, हळद, मिरची पावडर, पापड, खारोडी, धपाटे पीठ, ढोकळा पीठ, विविध डाळी, बाटी पीठ, विविध फरसाण, गावठी तूप, ॲपल जॅम, मध, गोड पदार्थ, घोंगडी, योगा मॅट, पत्रावळी, लाकडी खेळणी आदी विविध उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत. याशिवाय ग्रामीण भागातील अस्सल चविष्ट शाकाहारी व मांसाहारी जेवण, तसेच दहीधपाटे, झुणका–भाकर, भरीत–भाकरी, मिसळ, वडापाव अशा विविध खाद्यपदार्थांची चवही नागरिकांना चाखता येणार आहे. ग्रामीण महिला बचत गटांनी तयार केलेल्या या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी जालना जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदी करावी व महिलांच्या उद्यमशीलतेला पाठबळ द्यावे, असे आवाहन केले आहे.

# जेसीबीच्या बाजूला जेवायला बसले, कामगारांना ट्रकने उडवलं


### छत्रपती संभाजीनगर समृद्धी महामार्गावर दोघांचा जागीच मृत्यू, ३ जखमी



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरजवळ समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झालाय. सीसीटीव्ही बसवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना भरधाव ट्रकने उडवले. या दुर्घटनेत दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दुपारच्या वेळी जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत असताना जेसीबीसह कामगारांना ट्रकने उडवलं. या अपघाताने मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरील ४०६ पॉईंटवर सीसीटीव्ही बसवण्याचं काम सुरू होतं. दुपारच्या सुमारास काही कामगार जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत होते. त्याच वेळी भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने अचानक जेसीबी आणि तेथील कामगारांना जोरदार धडक दिली. ट्रकची धडक इतकी जोरदार होती की कामगारांना सावरायलाही वेळ मिळाला नाही. या भीषण अपघातात दोन कामगारांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.अपघातानंतर परिसरात गोंधळ उडाला. जखमी कामगारांना तातडीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आलं आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे. समृद्धी महामार्गावर सीसीटीव्ही बसवण्याचं काम सुरू असताना ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. दुपारच्या वेळी जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत असताना ट्रकने जेसीबीसह कामगारांना उडवल्याने ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि महामार्ग सुरक्षा पथक घटनास्थळी दाखल झाले. समृद्धी महामार्गावर घडलेल्या या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. कामगार सीसीटीव्ही बसवण्याचं काम करत असताना ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. सध्या या घटनेनंतर जखमींवर उपचार सुरू असून अपघातात मृत्यू झालेल्या कामगारांची ओळख अद्याप समोर आलेली नाही. अपघाताचे नेमके कारण शोधले जात आहे. समृद्धी महामार्गावर झालेल्या या दुर्घटनेमुळे कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## नाथषष्ठीनिमित्त सोमवारी (दि.९) पैठण येथे जिल्हा प्रशासनाचा 'सेवाभक्ती संगम'



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

पैठण येथे नाथ षष्ठी निमित्त जिल्हा प्रशासनातर्फे सोमवार दि.९ रोजी नाथांची भक्ती आणि प्रशासकीय सेवा असा संयोग साधून 'सेवाभक्ती संगम' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. पैठण येथिल तहसिलदार कचेरीत हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. पैठण येथे नाथषष्ठीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून भायेत असतात. नाथ महाराजांच्या दिंडीप्रित्यर्थ मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होत असतांना प्रशासनामार्फत स्वच्छता अभियान, शासकीय योजनांची जनजागृती, आरोग्य तपासणी शिबिर इ. अनेक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. प्रशासकीय यंत्रणेमार्फत विविध सेवा पुरविल्या जाणार आहेत. 'सेवाभक्ती संगम' हा कार्यक्रम हा सोमवार दि.९ रोजी सकाळी ९ वा. तहसीलदार कार्यालय पैठण येथील सभागृहात घेण्यात येणार आहे. भक्ती गीत, त्यानंतर शासकीय योजनांविषयी, शासकीय सेवांविषयी माहिती देण्यात येईल.छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान किंवा विविध महसूल अभियानाअंतर्गत द्यावयाचे समाधान शिबिर, शिबिराबद्दल सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. ग्राम विकास विभाग, कृषी विभाग इ. विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा याबद्दल माहिती देण्यात येईल. त्या नंतर श्री. संत एकनाथ महाराजांचे जीवन चरित्र व त्यांचे साहित्यावर सुप्रसिद्ध लेखिका/ कीर्तनकार डॉ. सविता मुळे(क्रांती डांगे) यांचे व्याख्यान होईल. त्या नंतर उपस्थित मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. या निमित्ताने येणाऱ्या नागरिकांचे आरोग्य तपासणी शिबिर, महिला बचत गटांनी निर्मित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री हे सुद्धा त्या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती 'बालस्नेही' करा: जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

बालविवाह, बाल भिक्षेकरी, बाल कामगार, शाळा बाह्य मुले, बालकांचे आरोग्य यासारखे प्रश्न तळागाळापासून सोडविण्यासाठी शहरी व ग्रामिण भागात सारखेच प्रयत्न आवश्यक आहेत. त्यादृष्टिने ग्रामबाल संरक्षण समिती तयार करुन जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती बालस्नेही कराव्या, असे निर्दे श आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. जिल्हा महिला व बालविकास विभागाची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात




पार पडली. उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा श्रीमती संगिता राठोड, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र दराडे,मनपा उपायुक्त लखीचंद चव्हाण, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगरे, परिविक्षा अधिकारी रवि भिमनवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मंगला पांचाळ, जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष रविंद्र नातनेश्वर आदी या बैठकीस उपस्थित होते. बैठकीत अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, हुंडा प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार संरक्षण अधिनियम, जिल्हा बालसंरक्षण समिती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, बाल भिक्षेकरी, बाल कामगार शोध मोहिम, बालविवाह प्रतिबंध, ग्राम बाल संरक्षण समिती, वार्ड बालसंरक्षण समिती, अनाथ बालकांचे प्रश्न, बालकांसंबंधी विविध पोर्टल,बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती,चाईल्ड हेल्प लाईन, पंचसुत्री बालकांची उपक्रम, कोविड मध्ये पालक गमावलेल्या बालकांसाठीचे जिल्हा कृती दल,प्रतिपालकत्व मंजुरी समिती, जिल्हा पुनर्वसन समिती, जिल्हा परिविक्षा समिती अशा विविध समित्यांचा आढावा सादर करण्यात आला. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, बालविवाह प्रतिबंधासाठी जनजागृती सोबत कायदेशीर कारवाई असणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामिण भागातील ग्राम बाल संरक्षण समित्यांची स्थापना करुन त्या कार्यान्वीत करण्यात याव्या. तसेच शहरी भागात वार्ड बाल संरक्षण समित्यांची स्थापना करण्यात यावी.महसूल विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व सेवा समाधान शिबिराच्या ठिकाणी सुद्धा या योजनांची जनजागृती करण्यात यावी,असे निर्देश दिले. महिला व बालकल्याण विषयाचे कामकाज हे केवळ प्रशासकीय कामकाज नसून ते एक सामाजिक कार्य आहे. त्यादृष्टिने संवेदनशिलतेने ते हाताळावे,असेही त्यांनी सांगितले.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार दि. ०७ मार्च २०२६ ●

## थोडक्यात...

### अजित देशमुख यांची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड



**माकेगाव । प्रतिनिधी**

आपल्या स्वप्नांना कष्टाची जोड असेल तर यशाची पायरी नक्कीच गाठता येते हेच माकेगाव येथील प्रगतिशील शेतकरी जयसिंगराव देशमुख यांच्या मुलाने करून दाखवून दिले आहे. नुकत्याच घेण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग या परीक्षेत अजित देशमुख यांनी हे यश मिळवले आहे.अगदी कमी वयात माकेगावातून पहिले पोलिस उपनिरीक्षक होण्याचा मान मिळवला आहे. अजित देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे माध्यमिक शिक्षण ममदापूर येथील संभाजीराव बडगिरे महाविद्यालय येथे तर पदवीचे शिक्षण लातूर येथे झाले.अजित देशमुख हे अगदी बालपणापासून हुशार जिद्दी आणि चिकाटीबाज असून अधिकारी होण्याचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अहोरात्र प्रचंड अभ्यास मेहनत घेत आपले खाकी वर्दीचे स्वप्न पूर्ण केले. त्यांच्या यशाबद्दल गावकऱ्यांनी अभिनंदन करत गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची आतषबाजी करत पेढे वाटून आनंद साजरा केला.

### वसंत ऋतूची चाहूल देणारी पानगळती झाली सुरु !

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

वसंत ऋतूची चाहूल लागताच झाडांची जुनी, वाळलेली पाने गळून पडतात. ही प्रक्रिया नैसर्गिक आहे. उष्णता आणि पाणीटंचाईमुळे झाडे स्वत:वरील ताण कमी करण्यासाठी जुनी पाने गाळतात. कालांतराने नव्या ऋतूत नवी पाने येतात. बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात अनेक ठिकाणी पानगळ नजरेस पडू लागली असुन ही पानगळ क्षणिक असून, लवकरच नव्या ऋतूत नवी पालवी मन प्रसन्न करणारी उदयास येणार आहे. दरवर्षी हिवाळ्याच्या अखेरीस पानगळ सुरू होते. वसंत ऋतूच्या आगमनाचे हे संकेत असतात. पिंपळनेर परिसरातील विविध भागांत निरनिराळ्या जातीची वृक्षसंपदा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामधील काही झाडांची पानगळती विशिष्ट ऋतूनुसार होताना दिसून येते. या पानगळतीबाबत पर्यावरणप्रेमी, समाजसेवक, पत्रकार, वृक्षप्रेमी, नागरिक यांच्याकडून विविध माध्यमांतून चिंता व्यक्त होताना दिसून येते. वास्तविकत: झाडांची पाने गळणे ही अत्यंत नैसर्गिक आणि महत्त्वाची प्रक्रिया आहे. याला शास्त्रीय भाषेत पर्णपात असे म्हणतात. हिवाळ्यात झाडांमध्ये ऐबासीसिक ॲसिड नावाचे संप्रेरक तयार होते. यामुळे फांदी आणि पानांच्या देठांमध्ये एक पातळ स्तराची भिंत तयार होते. या स्तरामुळे पानाला मिळणारे पाणी आणि पोषकतत्त्वे थांबतात आणि पाने सुकून खाली पडतात. मात्र, काही कालावधीनंतर या झाडांना नवी पालवी फुटते.

### वैष्णवी महाविद्यालयाच्या रासयोचे विशेष शिबीराचा समारोप



**वडवणी । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्न व साहेबराव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित , वैष्णवी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबार पुसरा येते आयोजित करण्यात आले होते . या शिबिराची समारोप दि. ६ मार्च शुक्रवार रोजी संपन्न झाला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून वडवणी पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी जोगदंड सर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दत्ता सरवदे होते. प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले.या योजनेमध्ये विद्यार्थी कसा घडतो , तसेच राष्ट्राची सेवा कशी करायची हे या मधून विद्यार्थी शिकतो. असे ते म्हणाले, तर अध्यक्षीय समारोपात प्राचार्यांनी विशेष शिबीरा अंतर्गत केलेल्या विविध कामाचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.गणेश शित्रे व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मुंजाजी सोळंके यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवजयंतीच्या निमित्ताने बिबी गावात 'शेतकरी अभियाना'चे यशस्वी आयोजन

**मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा स्तुत्य उपक्रम**



**बीड । प्रतिनिधी**

दि.०६.०३.२०२६ रोजी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार साजरी होत असलेल्या जयंतीचे औचित्य साधून, बीड येथील 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे'च्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बिबी गावात विशेष 'शेतकरी अभियाना'चे आयोजन करण्यात आले होते. शिवरायांच्या शेती आणि रयत-कल्याणाच्या विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने पुढे नेण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांचा हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड यांच्या माध्यमातून हे शेतकरी अभियान राबविण्यात आले. शेतकर यांनी आधुनिक शेती, शेती संबंधित विविध योजना, शेती बद्दल विविध उद्योग/प्रकल्प यांच्या बद्दल माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव तेजस पवार,रोहन डोळस, तेजस्विनी पवार,सदस्य,व गावकरी उपस्थित होते.

# तुकाराम बीज निमित्त ह.भ.प. विनोदाचार्य ओमकार महाराज घोलप यांचे कीर्तन



**वडवणी । प्रतिनिधी**

तुकाराम बीज निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळ्यात ह.भ.प. विनोदाचार्य ओमकार महाराज घोलप यांनी संत विचारांचे प्रभावी आणि मार्गदर्शक कीर्तन सादर केले. या कीर्तनातून त्यांनी संत साहित्याचा आधार घेत मानवी जीवनातील चांगल्या विचारांचे महत्त्व, चांगली संगत आणि व्यसनमुक्त जीवनाचा संदेश भाविकांना दिला. कीर्तनातील हृदयस्पर्शी प्रसंग ऐकून उपस्थित भाविक भावुक झाले, तर अनेक महिलांना अश्रू अनावर झाले.

कीर्तनाच्या प्रारंभी महाराजांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा संदर्भ देत आता तरी पुढे हाचि उपदेश, नका करू नशा आयुष्याचा या ओळींचा अर्थ स्पष्ट केला. संत तुकाराम महाराज या अभंगातून माणसाला उपदेश करतात की, आपल्या आयुष्याचा नाश होईल अशा वाईट गोष्टींपासून दूर राहावे. दुसऱ्या चरणात सकळांच्या पाया माझे दंडवत, आपुलाले चित्त शुद्ध करा असे सांगत ते सर्वांच्या पाया पडून माणसाला आपल्या मनाची शुद्धता राखण्याचा संदेश देतात.

तिसऱ्या चरणामध्ये तुकोबाराय सांगतात की, माणसाचे खरे हित भगवंताच्या भजनात आणि नामस्मरणात आहे. मात्र ते भजन शुद्ध मनाने केले पाहिजे. मन शुद्ध असेल तरच भजनाचे खरे फळ मिळते. चौथ्या चरणामध्ये तुका म्हणे लाभ होय तो व्यापार करा, काय फार शिकवावे असे सांगत माणसाने ज्या गोष्टीत आपले हित आहे तोच मार्ग स्वीकारावा, असा संतांचा संदेश आहे. यावेळी महाराजांनी संतांचे विचार हे केवळ अध्यात्मिक नसून प्रापंचिक जीवनालाही दिशा देणारे आहेत, असे सांगितले. संत नेहमी आपल्या वाणीचा उपयोग लोककल्याणासाठी करतात. मानवी जीवन अधिक सुखमय कसे होईल याचा संतांनी सतत विचार केला आहे. शिक्षणाबरोबरच माणसामध्ये संस्कार असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्याच्याकडे शिक्षणासोबत संस्कार आहेत तोच खरा सुशिक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराजांनी संगतीचे महत्त्व पटवून देताना संगत करावी सदा सज्जनाची, सावली नसावी दृष्ट दुर्जनाची हा संतविचार मांडला. वाईट संगती माणसाला चुकीच्या मार्गावर नेते आणि त्याचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते, तर चांगली संगत माणसाला योग्य मार्गावर ठेवते, असे त्यांनी सांगितले.

कीर्तनादरम्यान महाराजांनी एक सत्य घटना सांगत व्यसनाचे दुष्परिणाम स्पष्ट केले. एका गावातील एका व्यक्तीकडे चाळीस एकर जमीन होती. तो मनाने उदार होता. गावातील कोणाच्या लग्नात अन्नदान करणे, कन्यादान करणे असे समाजकार्य तो करत असे. त्यामुळे गावात त्याला मोठा मान होता. मात्र काही लोकांना त्याची प्रगती सहन झाली नाही. त्यांनी त्याच्याशी मैत्री करून हळूहळू त्याला दारूच्या व्यसनात ओढले.

काळाच्या ओघात तो इतका व्यसनाधीन झाला की त्याला आपल्या आयुष्याचा नाश होत असल्याचेही कळले नाही. शेवटी त्याची जमीन-जुमला, घरदार सर्व व्यसनाच्या आहारी गेले. नंतर त्याची प्रकृती गंभीर झाली. डॉक्टरांनी उपचारासाठी मोठा खर्च सांगितला; मात्र त्याच्याकडे पैसे नव्हते. अखेर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

त्याच्या मृत्यूनंतर काही दिवस शेजाऱ्यांनी मदत केली; परंतु नंतर तेही थांबले. घरात खायला काही उरले नव्हते. लेकरांनी आईला भूक लागल्याचे सांगितले. घरातील डब्यात थोडे पीठ शिल्लक होते. आईने ते पाण्यात टाकून उकळून मुलांना दिले. हा प्रसंग सांगताना महाराजांनी सांगितले की, माणूस व्यसनाच्या आहारी गेला तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावा लागतो.

हा हृदयस्पर्शी प्रसंग ऐकून उपस्थित भाविक भावुक झाले. अनेक महिलांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. शेवटी महाराजांनी संतांचा संदेश देत सांगितले की, माणसाने कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी विचार करावा, चांगली संगत ठेवावी आणि भगवंताच्या नामस्मरणात राहून आपले जीवन सुखी व समाधानकारक करावे.

या कीर्तन कार्यक्रमास परिसरातील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. संतविचारांच्या या कार्यक्रमातून उपस्थितांना आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ झाला.

## भगवंत उदार अंत:करणाचा आहे – ह.भ.प. राजेन महाराज भोसले



**बीड । प्रतिनिधी**

नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी येथे दि. ५ मार्च २०२६ रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञानयज्ञ व त्रिदिनी कीर्तन महोत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त ह.भ.प. राजन महाराज भोसले यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले.

आपल्या कीर्तन सेवेत त्यांनी प्रतिपादन केले की, भगवंत हा उदार अंतःकरणाचा असून तो आपल्या भक्तांचे रक्षण करतो, त्यांना सांभाळतो आणि त्यांच्या जीवनातील अनिष्ट दूर करून शेवटी मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवतो. खर्डेवाडी येथे ह भ प भागवत कथा प्रवक्ते रामचंद्र महाराज जगताप यांच्या संगीत श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यां सात दिवसांत भाविकांनी मोठ्या श्रद्धेने व भक्तीने भागवत कथा श्रवण केली. या बीज उत्सवानिमित्त त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचेही आयोजन करण्यात आले. या कीर्तन महोत्सवात ह.भ.प. श्रीनिवास महाराज जगताप, ह भ प नारायण महाराज शिरसट तसेच ह.भ.प. डॉ. केशवदास महाराज वैष्णव यांची हरिकीर्तन सेवा संपन्न झाली. या बीज उत्सवानिमित्त व श्रीमद संगीत भागवत कथा , किर्तन महोत्सव आणि दररोज सायंकाळी पाच ते सहा या वेळेत खर्डेवाडी भजनी मंडळाचा संगीत हरिपाठ नित्यनेमाने मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला या हरीपाठासाठी गावातील बहुसंख्येने भाविक उपस्थिती लावून आनंद घेतला. त्या,बरोबरच फुगड्याचाया उपक्रमांतर्गत ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथेचे अभ्यासक ह भ प हरिदास सोळंके महाराज गुरुजी ,यांच्या मार्गदर्शनाखाली या भागवत कथेमध्ये साधकांना तुकाराम महाराज गाथा ग्रंथ भेट देण्यात आले.

## खोट्या दिव्यांगांविरुद्ध मोहीम अधिक कडक करा ; गुन्हेगारांवर थेट गुन्हे दाखल करा – शाहू (अप्पा) डोळस



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात खोट्या दिव्यांगांचा सुळसुळाट वाढत असून यामुळे खऱ्या दिव्यांग बांधवांच्या हक्कांवर गदा येत आहे. त्यामुळे सुरू असलेली बोगस दिव्यांग शोध मोहीम अधिक कडक करण्यात यावी आणि संबंधितांवर थेट गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी रिपाई दिव्यांग गाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शाहू (अप्पा) डोळस यांनी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने एसटी महामंडळामार्फत बोगस दिव्यांग तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र केवळ दिव्यांगांचे णऊखऊकार्ड तपासून ते जमा करून घेणे पुरेसे नाही. ज्या ठिकाणी बोगस णऊखऊ कार्ड आढळेल, ते तात्काळ जप्त करून संबंधित व्यक्तीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. तसेच हे कार्ड कोणाकडून तयार करण्यात आले, किती बनावट कार्ड तयार झाली आणि त्यामागे कोणती टोळी कार्यरत आहे, याचा सखोल तपास झाला पाहिजे, असे डोळस यांनी स्पष्ट केले. फक्त बसमध्ये ओळखपत्र तपासून कारवाई पूर्ण होत नाही. खरा गुन्हेगार शोधून त्याला शिक्षा झाली पाहिजे. अन्यथा खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. यापूर्वी दिव्यांग विभागात कार्यरत असताना माननीय तुकाराम मुंढे यांनी बोगस दिव्यांगांची निपक्षपाती तपासणी करून कठोर पावले उचलली होती. मात्र त्यांच्या बदलीनंतर ही कारवाई शिथिल झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाने दिव्यांगांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी ठोस आणि कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. एसटी महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबवून खोट्या दिव्यांगांविरुद्ध पोलिसांकडून कठोर कारवाई करावी आणि खऱ्या दिव्यांग बांधवांना न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन शाहू (अप्पा) डोळस यांच्यासह रमेश झोडगे, राजू ढवारे, दिगंबर लोखंडे, सिद्दू खंडागळे, प्रभू माने, खरात, कुलगुडे, प्रवीण सोनवणे, अभिमान जाधव, भानुदास मजमुले, विशाल माने, शरद सानप, काशीद आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## 'यूपीएससी'मध्ये पांगरीच्या हर्षवर्धन तिडके यांचे यश

**● राष्ट्रीय पातळीवर ३५५ वी रँक ; सर्वोच्च नागरी सेवेत स्थान निश्चित**



**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील पांगरी (गोपीनाथगड) येथील हर्षवर्धन अशोक तिडके यांनी संघ लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर ३५५ वी रँक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे त्यांनी देशातील सर्वोच्च नागरी सेवेत आपले स्थान निश्चित केले आहे.

ग्रामीण भागातून शिक्षण घेत कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हर्षवर्धन तिडके यांनी हे यश मिळवले. त्यांनी मुंबई येथील आयआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून शिक्षण पूर्ण केले असून, यूपीएससी परीक्षेची संपूर्ण तयारी त्यांनी स्वतःहून केली. हर्षवर्धन तिडके यांचे वडील अशोक तिडके हे कृषी विभागात अधिकारी असून, त्यांच्या मार्गदर्शनाचाही त्यांना लाभ झाला. हर्षवर्धन यांच्या या यशामुळे पांगरी (गोपीनाथगड) गावासह परळी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी अनेकांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# लिंबागणेश येथे गुलाल मुक्त, डीजेमुक्त शिवजयंती!

## पारंपरिक लेझीम-ढोल ताशांच्या गजरात लक्ष्यवेधी मिरवणूक



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावन भूमीत लिंबागणेश येथे डीजेच्या कानठळ्या बसवणाऱ्या गोंगाटाला पूर्णविराम देत आणि रासायनिक आणि बनावट गुलाल त्वचेसाठी हानीकारक असल्याने गुलालाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी गुलाल मुक्त पारंपरिक वाद्यांच्या निनादात सार्वजनिक शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दि.०५ गुरुवारी सायं. ५ वाजता भालचंद्र माध्यमिक विद्यालय येथून मिरवणुकीला प्रारंभ झाला. आकर्षक फुलांनी सजवलेल्या रथातून विराजमान असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांची देखणी मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. घोड्यावर विराजमान राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा जिवंत आकर्षक देखावा आणि डीजेमुक्त, गुलाल मुक्त, शिस्तबद्ध आणि पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेली ही मिरवणूक ग्रामस्थांसाठी विशेष आकर्षण ठरली. प्रा . सचिन वाणी सरांच्या मार्गदर्शनात भालचंद्र माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादर केलेले लेझीम नृत्य आणि त्याला लाभलेली ढोल-ताशांची दमदार साथ उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. तरुणांनी दाखवलेला संयम, शिस्त आणि सांस्कृतिक बांधिलकी हेच या सोहळ्याचे खरे वैशिष्ट्य मानले जात आहे.अवाजवी खर्च टाळून मूळ परंपरेचे जतन करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग मिरवणुकीत दिसून आला. मिरवणुकीच्या प्रमुख मार्गावर महिलांनी पारंपरिक पद्धतीने रांगोळी काढून स्वागत केले, त्यामुळे संपूर्ण गावात उत्सवी आणि संस्कृतीप्रधान वातावरण निर्माण झाले. डीजेमुक्त, शिस्तबद्ध आणि सांस्कृतिक वारसा जपणारी ही शिवजयंती लिंबागणेशकरांसाठी अभिमानाची ठरली.